प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA

**संचार विभाग,** केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001
DEPARTMENT OF COMMUNICATION, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 91 22 2266 0502 फैक्स/Fax: 91 22 22660358

वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
इ-मेल email: helpdoc@rbi.org.in

फेब्रुवारी 25, 2016

**तुमचा ग्राहक जाणा (केवायसी) वरील सर्वसमावेशक महा-निदेश**

भारतीय रिझर्व बँकेने आज, तुमचा ग्राहक जाणा (केवायसी), अँटी मनी लँडरिंग (एएमएल), दहशतवादाला वित्त सहाय्य करण्याबाबत सामना (सीएफटी) ह्यावरील महानिदेश दिले आहेत. आज दिलेल्या महा-निदेशांमध्ये, रिझर्व बँकेच्या निरनिराळ्या विभागांनी, ह्या विषयांवर आतापर्यंत दिलेल्या सूचना एकत्रित करण्यात आल्या आहेत आणि त्या तिच्या नियंत्रणाखालील सर्व संस्थांना लागु असतील.

**पार्श्वभूमी**

सप्टेंबर 29, 2015 रोजीच्या केलेल्या चौथ्या द्वैमासिक नाणेविषयक धोरण निवेदन 2015-16 मध्ये घोषित केलेल्या निर्णयानुसार, भारतीय रिझर्व बँकेने, जानेवारी 2016 पासून, अनुपालनात सुसुत्रता आणण्यासाठी, सर्व विनियामक बाबींवर महानिदेश देणे सुरु केले आहे. ह्या महानिदेशात बँकिंग सबंधीचे प्रश्न व विदेशी मुद्राव्यवहारांसह, निरनिराळ्या अधिनियमांखाली रिझर्व बँकेने तयार केलेले नियम व विनियम ह्यावरील सूचना समाविष्ट केलेल्या आहेत. महानिदेश देण्याची प्रक्रिया म्हणजे, प्रत्येक विषयासाठी, त्या विषयावरील सर्व सूचना समाविष्ट असलेला एकच महा-निदेश देणे. त्यामध्ये कोणतेही नियम, विनियम किंवा धोरणात बदल झाल्यास, तो त्याच वर्षी, परिपत्रके/वृत्तपत्र निवेदनांमार्फत कळविला जातो. नियम/विनियम किंवा धोरणांमध्ये एखादा बदल झाल्यास तो महा-निदेश त्याच वेळी व सुयोग्यतेने अद्यावत केला जातो. आवश्यक असेल तेव्हा, नियम व विनियमांबाबतची स्पष्टीकरणे, सहज समजता येणा-या भाषेतील नेहमी विचारल्या जाणा-या प्रश्नांच्या (एफएक्यु) स्वरुपात, तो महानिदेश दिल्यानंतर दिले जातील. निरनिराळ्या विषयांवर दिलेली विद्यमान महापरिपत्रके, ह्या विषयावर दिलेल्या महानिदेशांमुळे रद्दबातल होतील.

**अल्पना किलावाला**
प्रधान सल्लागार

**वृत्तपत्र निवेदन : 2015-2016/2014**